# आसेगाव पोलिसांनी चार तासात लावला सहा मुलांचा शोध दि. ०१/०३/२०२०

देशोन्नती
वैचारिक क्रांतीचा अग्रदूत

## वाशिम पोलिसांनी चार तासात लावला सहा मुलांचा शोध

## मेहकर येथून घेतले 'त्या' मुलांना ताब्यात



पोलिसांनी वडीलांच्या ताब्यात दिलेली मुले व पोलीस पथक

**मेहकर** ▫ विशेष प्रतिनिधी

वाशिम जिल्ह्यातील आसेगाव पोलीस स्टेशन अंतर्गतच्या शिवनी दलेरपूर यात्रेतून बेपत्ता झालेल्या सहा मुलांना अवघ्या चार तासात वाशिम पोलिसांनी मेहकर येथून ताब्यात घेतले आहे.

उत्तर प्रदेश येथील मूळ रहिवासी असलेला राजू सुदामा गुप्ता हा ठिकठिकाणच्या यात्रेत पाळणा आणि झुलाचा व्यवसाय करून आपला उदरनिर्वाह करत असतो. सदर इसमास एकूण ६ मुले असून त्याची पत्नी मरण पावलेली आहे. यापैकी चार मुली, दोन मुले असून राजू गुप्ता यास दारूचे व्यसन असल्याने त्याला कंटाळून १४ वर्षीय मुलगी सोनू राजू गुप्ता आपले पाच भावंडे यांना सोबत घेऊन तिने मेहकर गाठले.

शिवणी दलेरपुर यात्रेतून सहा मुले बेपत्ता झाल्याची माहिती ठाणेदार शिवाजी लष्करे यांना समजताच जिल्हा पोलीस अधीक्षक वसंत परदेशी, अपर पोलीस अधीक्षक विजयकुमार चव्हाण यांनी दोन पथके तयार करून एक रिसोड भागात आणि दुसरे मेहकर भागात पाठविले होते. पोलीस अधीक्षक वसंत परदेशी आणि अप्पर पोलीस अधीक्षक विजयकुमार चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली शिवाजी लष्करे व त्यांच्या सहकाऱ्यांनी मिळालेल्या गुप्त माहितीनुसार मेहकर येथील पंचशील नगरातील महादेव साबळे यांची मुलगी सोनू गुप्ता यांची मैत्रीण असल्याचे समोर आल्याने आणि महादेव साबळे यांचे घरी पाच - सहा मुले असल्याचे समजल्याने तातडीने ठाणेदार लष्करे, पोलीस उप निरीक्षक खंडार यांनी पंचशील नगर मेहकर येथे येऊन महादेव साबळे यांचे घरून सोनू राजू गुप्ता वय १४, पूजा राजू गुप्ता वय १०, दुर्गा राजू गुप्ता वय ४ अशा चार मुली व दादू राजू गुप्ता वय ३ व रुद्र राजू गुप्ता वय अकरा महीने या बालकांना ताब्यात घेऊन वडील राजू गुप्ता कडे सुपूर्द केले.